**<u>नियमित दरखास्त नं. ८४/२०१९</u>**

## निशाणी क्र.१३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा ऋणको यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १४१ सह ऑर्डर ७ रुल ११ अ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये ऋणको यांनी असे कथन केले की, ऋणको यांनी वादातील हुकूमनाम्याचा अवमान केला नाही किंवा तसा कोणताही पुरावा धनको यांनी दरखास्तीसोबत सादर केलेला नसल्यामुळे दरखास्तीस कारणच घडले नाही. त्यामुळे विनाकारण दाखल केलेली दरखास्त खर्चासह रद्द करावी अशी विनंती केलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जावर धनको यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असुन त्यांनी सदर अर्जाला हरकत नोंदविली आहे. धनकोंचे असे कथन आहे की, सदरचा अर्ज हा कोणत्या कायदयाच्या तरतुदीखाली दाखल केलेला आहे हे नमुद केले नाही त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा चालण्यास पात्र नाही म्हणुन सदरचा अर्ज हा नामंजुर करण्यात यावा.

३. प्रस्तुत अर्जाचे व दिलेल्या म्हणण्याचे आणि अभिलेखावर असलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. ऋणको यांनी निशाणी १० वर त्यांचे म्हणणे दाखल केले असुन त्यामध्ये स्पष्टपणे असे कथन केले आहे की, वाद मिळकतीत आजही त्यांचा म्हणजे ऋणको यांचीच शांततामय कब्जे वहिवाट होती व आहे शिवाय धनको हे ऋणको यांना हरकत अडथळा करतात. सदर जो काही मजकुर त्यांनी त्यांच्या निशाणी १० मधील दिलेल्या म्हणण्यामध्ये दाखल केलेला आहे त्यावरुन अशी शंका उत्पन्न होते की, आदेशानंतर दावा मिळकतीचा ताबा नेमका कोणाकडे आहे. आदेश हा दिनांक १३/०५/२०१६ रोजी झालेला असुन आजतागायत दावा मिळकत ही कोणाच्या ताब्यात होती व वादीने त्याचा ताबा आदेशाप्रमाणे घेतला किंवा कसे या सर्व बाबींबाबत संदिग्धता असल्यामुळे नक्कीच सदर दरखास्तीमध्ये दोन्ही पक्षकारांनी याबाबत खुलासा करण्याची संधी ही नक्कीच भविष्यामध्ये असल्यामुळे केवळ ऋणको यांनी जो अर्ज दाखल केला आहे त्या मोघम कथनावरुन संपुर्ण दरखास्त ही रद्द करणे न्यायोचित नाही. त्यामुळे एकंदरीत ज्या काही बाबी अभिलेखावर दिसुन येतात त्यावरुन प्रस्तुतचा

अर्ज हा नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Dipti Mallikarjun Bhande
Digitally signed by Dipti Mallikarjun Bhande
Date: 2022.04.28 10:59:04 +0530

(श्रीमती डी.एम. भंडे)

दिनांक – २६/०४/२०२२ ३ रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer : | A. P. Patil |
| Court : | IIIrdJt.C.J.J.D. & J.M.F.C., Sangli. |
| Date : | 26/04/2022 |
| Order signed by the Presiding Officer on : | 26/04/2022 |
| Order uploaded on : | 28/04/2022 |